




सौ. सुनिता गोखले
सेवा निवृत्त शिक्षिका
नागपूर

## माणुसकी

आईच्या बोलण्यातून काळजी डोकावत होती. आता त्याला दिवसभरात घडलेली घटना सांगणं क्रमप्राप्त होतं. आता बाबाही समोर येऊन बसले. त्याच्या तोंडून सर्व घटना ऐकत असतांना काळजी, चिंता, दुःख,आनंद सर्व काही आईबाबांच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसत होतं. ''देवा! त्या पोरींचं सगळं चांगलं होऊ दे रे. तिला लवकर बरं वाटू दे. पूर्वीर्ध सारखं तिला चांगलं बोलता येऊ दे रे देवा.'' आई मनोमन देवाजवळ प्रार्थना करित होती. ही न पाहिलेली मुलगी पण तिला आपलीच वाटत होती. 'आई ग! पटकन काहीतरी खायला दे नं. खूप भूक लागली आहे.' हो हो आणते रे माझ्या राजा. गरमागरम पोह्याची डिश त्याच्या समोर धरत आईने विचारले. 'का रे गर्दीत एवढे लोकं होते पण तुलाच कशी काय मदत करण्याची बुद्धी झाली.' 'अगं आई, तू नाही का आपल्या सखूबाईंना, कमलाबाईना अडचणीत मदत करत मागे एकदा सखूबाई पाय घसरून पडल्या. हात फ्रॅक्चर झाला. तेंव्हा तूच नाही का त्यांना दवाखान्यात नेलं. हाताला प्लॅस्टर करवलं त्याचे औषधपाणी केले. दिड महिना सक्तीची विश्रांती घ्यायला लावली. वर त्यांना दोन महिन्याचा पगारपण दिला. तेच मी पण केलं. त्यात विशेष काय आहे. आईकडे बाबांनी सहेतुकपणे पाहिलं.' बाबा म्हणाले 'बघा तुम्ही केलेल्या सुसंस्काराचं हे फळ आहे हो,सतीशला वाढवितांना त्याच्यावर संस्कार वाटताना आपण फार जागरूक होत्या. एकुलता एक मुलगा म्हणून त्याला खूपव लाडावून न ठेवता त्याचे पया कायम जमिनीवर राहतील याची आपण काळजी घेतली' 'इंश्य तुमचं आपलं काहीतरीच'.... या वयातही आशा ताई म्हणजे आई झकासपैकी लाजल्या. 'आई चहा झाला का ग!' सतीशच्या आवाजाने त्या भानावर आल्या. पोह्याची रिकामी प्लेट घेऊ चहा आणायला किचनमध्ये गेल्या. 'अरे त्या मुलीच्या रेहानाच्या घरी फोन करून प्रकृतीची चौकशी कर नं' अगं मला काय त्यांचा नंबर थोडाच पाठ आहे. त्यांचाच काहीतरी फोन येईल. माझं कार्ड त्यांना मी दिलं आहे. चहाचा घोट घेत सतीश म्हणाला. बाबा सांगत होते. 'संक्रांतीच्या या महिनाभरात अशा कितीतरी घटना, गोष्टी घडतात.गच्चीवर पतंग उडवताना एक मुलगा चौथ्या मजल्यावरून खाली पडला. पायाला जबर दुखापत झाली. कायमस्वरूपी अपंगत्व आलं. कटलेला पतंग मिळविण्याकरिता दोन गटात मारामारी झाली. त्याचा विपर्यास होऊन एकाने दुसऱ्यावर चाकुचा वार केला. स्कुटरवरून जाताना गळयाला मांज घासल्या गेल्याने जबर दुखापत झाली. कित्येकवेळा पतंगीच्या माग बेभानपणे धावणारी मुले रस्त्यावरच्या वाहनावर एकदम येऊन आदळतात. बिचाऱ्या वाहन चालकाची काहीच चूक नसतांना त्यालाच मार खावा लागतो आणि गर्दीची सहानुभूती मुलाला मिळते. काही पालक तर औषधोपचाराकरिता ही पैसे उकळतात. हे कोठेतरी थांबायलाच पाहिजे. आणि या मु लांना काही शाळा अभ्यास नसतोच का हो! आशाताईचा आईचा एक निरागस प्रश्न.' काही देशात पतंग उडविण्यावर बंदी आहे. काही ठिकाणी एका विशिष्ट दिवशीच ठराविक वेळात विशिष्ट मोकळ्या मैदानात पतंग उडविण्याची परवानगी असतेश. त्यामुहे पतंग उडविल्याचा आनंद सर्वांनाच मिळतो व त्यातून अपघातही घडत नाहीत. सतीश म्हणाला.

दुसऱ्या दिवशी सकाळी आठ वाजता डोअरबेल वाजली. आशाताईंनी दरवाजा उघडला. सलवार कमीज व अंगावर काळी ओढणी घेतलेली एक स्त्रि व पठाणी वेशातील पुरूष दारात उभे होते. ''सतीश बाबू यही रहते है क्या? '' हाँ हाँ आईये ना। तिने त्यांचे स्वागत केले. आपलं नाव ऐकून सतीश हॉलमध्ये आला. ''आईये चाचाजान अब रेहाना की तबीयत कैसी है ? कितने बजे उसे होश आया।सतीशने विचारले.'' दोनघंटे बाद उसे होश आया। अब तबीयत ठीक है। धीरे धीरे हल्की आवाज मे बात भी कर लेती है। बाबूजी अगर आप उसे वक्तपर अस्पतालन नही ले जाते, तो मेरी बेटी रास्तेपर रोती रहती। या मेरी बेटी गूँगी हो जाती या रास्तेपरही मर जाती। प्प का यह अहसान हम जिंदगीभर नही भुलेंगे। आप हमारे लिये फरिश्ता हो। खुदा आपकी उम्र बहोत लम्बी करे। असे म्हणत ते दोघेही जवळजवळ सतीशच्या पायाच पडले. ''मैने कुछ नही किया।

*सिर्फ अपना फर्ज अदा किया है।'' सतीशची नम्रता त्याच्या बोलण्यातून व्यक्त होत होती. सकाळची घाईची वेळ होती. सतीश त्यांना सांगून आत गेला. ऑफीसच्या तयारीला लागला. कालचं अपूर्ण काम आज पुर्ण करायच होतं. आज सबमिशन होतं. त्याकरिता ऑफीसमध्ये महत्त्वाची मिटिंग होती. त्याकरिता काही पेपर्स तयार करायचे होते. आज ऑफीसला लवकर जायचे होते.*

*रेहानाचे अम्मी, अब्बुख्र सतीशचे आई बाबा यांच्यात बोलणे चालू होते. चहा, फराळ झाल. दवाखान्यात सतीश काही खर्च केला होता. ते पैसे परत देण्याकरिता आणि सतीशचं आभार मानण्याकरिता रेहानाचे आई बाबा आले होते. थोडावेळ आई बाबांशी बोलून त्यांनी निरो घेतला. सतीश ही जेवून ऑफीसला जाण्याकरिता तैयार झाला. स्कूटर किक मारून तो निघाला सुद्धा, ''सावकाश जा रे. ऑफीसचे कागदपत्र सर्व घेतले न.'' आईचे काळजीचे स्वर. ''सर्व व्यवस्थित घेतली आई चलतो मी'' मागही वळून न पाहता सतीश दृष्टीआड झाला.*

*त्याच्या पाठमोऱ्या आकृतिकडे पाहतांना आशाच्या(आईच्या) मनात एक विचार आला. पाहता पाहता सतीश किती मोठा झाला. रस्त्यावर आपघातग्रस्त मुलीला पाहून त्याच्यात माणूसकी जागृत झाली. रस्त्यावरचा एकही माणूस मदतीला नाही आली तरी स्वतःच्या हिमतीवर त्याने रेहानाला अॅडमिट केले. तिचे पालक येईपर्यंत तो तिच्याजवळ राहिला. इलाज, औषधाची व्यवस्था केली. आणि हे करतांना कोठेही मोठेपणा घेणे नाही केवळ कर्तव्यवृत्ती. खरोखरच आपण केलेल्या संस्कारांना अंकूर फुटले. पुढे त्याचाच सुगंध सत्कृत्यातून समाजात दरवळेल. एक चांगला नागरिक घडविल्याचं समाधान एक सहृदय माणूस घडविल्याच समाधान आईला होतं. तिच्या मनात आलं माणूसकी ही कोणत्याही जाती धर्मावर अवलंबून नसते. ती निरोगी, सुदृढ मनाची वृत्ती प्रवृत्ती असते. सतीशची पाठमोरी आवृत्ती केंव्हाच दृष्टीआड झाली आणि आई शांतमनाने घरात वळली. घरातील कामं तिची वाट पाहत होती...*

विचक्षण इंद्रधनू। एप्रिल -२०१७